बदकांचे घरटे

एवलिन शॉ

चित्र: चेरिल पेप

मराठी: अश्विनी बर्वे




बदकांचे घरटे

एवलिन शॉ

चित्र: चेरिल पेप


मराठी: अश्विनी बर्वे





आता जंगलात वसंत ऋतू
सुरु झाला आहे, झाडांना
नवीन पालवी फुटते आहे.
छोटे पक्षी वसंताची गाणी
गात आहेत..

एका छोट्याशा तलावात दोन मोठे पक्षी एकमेकांच्या बरोबर पोहत आहेत. ती बदके आहेत. एक नर बदक आहे त्याला ड्रेक म्हणतात. त्यांचे पंख चमकदार आहेत आणि उन्हात ते चमकतात.



बदकाच्या मादीला हेन म्हणतात.

तिचे पंख चमकत नाही.


ते एकमेकांचे जोडीदार आहेत.



बदकाच्या मादीचे तलावाच्या जवळ एक घरटे आहे. ती नर बद्कापासून लांब पोहत जाते. ती आपले पंख फडफडते आणि एका झाडावर जावून बसते.



झाडाच्या फांदीला एक छोटीशी भेग आहे. बदकाची मादी आपले मोठे शरीर त्या भेगेत घुसवते.



आत अंधार आणि शांती आहे.

हेच तिचे घरटे आहे.


घरटे तिच्या पंखापासून आणि पानाच्या तुकड्यांपासून बनवलेले आहे. घरट्यात सहा अंडी आहेत.





मादी बदकाने सहा दिवस सहा अंडी दिली. आज तिने अजून एक अंडे दिले. मग ती आपले मोठे शरीर घरट्याच्या चारी बाजूला हव्लते. ती अंड्यांना पंखांच्या आणि पानांच्या खाली झाकून टाकते. आता अंडी सापांपासून आणि इतर प्राण्यांपासून लपून राहतील.

बदकाची मादी झाडावरून उतरते.
नर बदक तिची वाट बघतो आहे.
ते इकडेतिकडे उडतात. ते बिया, ओकची
फळे, तण शोधतात. ते पाणी पितात.
आपले पंख साफ करतात आणि
फुलवतात.





रात्री नर आणि मादी बदक
झाडाच्या एका फांदीवर
बरोबर आराम करतात.



दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी
मादी बदक आपल्या घरट्याकडे
उडत जाते. ती अजून एक अंडे
देते.

मग ती आपल्या छातीवरून
मुलायम पंख काढते.

आणि ते पंख ती आपल्या
घरट्यात ठेवून देते.



आता मादी बदक घरट्यातच राहिल.

जवळ जवळ तीस दिवस.


ती आपल्या अंड्यावर बसेल.

त्यामुळे अंड्यांना ऊब मिळेल.

पाने आणि पंखांमुळे सुद्धा अंडी ऊबदार
राहतील.

अंड्यात बदकाची पिल्ले वाढतील.

मादी बदक दिवसभर आणि रात्री सुद्धा
अंड्यावर बसून राहिल.



मादी बदक सकाळी आणि संध्याकाळी थोड्यावेळ फक्त बाहेर जाते. नर बदक नेहमी तिची वाट बघतो.

ते एकमेकाबरोबर उडतात, खातात-पितात आणि आपले पंख साफ करतात. मग दोघेजण परत झाडावर येऊन बसतात. मादी बदक आता घरट्यात जाते आणि नर बदक बाहेर तिची वाट बघत थांबतो. जोपर्यंत ती बाहेर येत नाही तोपर्यंत.



तीस दिवस संपल्यावर ववाट बघावी लागली नाही. नर बदकाचे अंडे बाहेर आल्यावर मोठे होतात. ती अंडी गोलगोल फिरू शकतात. बदकाचे पिल्लू बाहेरचे टरफल फोडायला सुरुवात करतात. याला पिपिंग म्हणतात.

दिवस जातात.

प्रत्येक अंडयात एक पिल्लू आहे.

त्याचे अन्न अंड्यातील पिवळा भाग आहे.





अजून एक बदकाचे पिल्लू आपले कवच फोडते, मग दुसरे, मग तिसरे.



काही तासानंतर बदकाची अंड्यातील सर्व पिल्ले बाहेर आली. ती ओली आणि चिपचिप होती.

ती आपल्या आईच्या
आसपास फिरत असतात.

आई तोपर्यंत घरट्यात बसून
राहते जोपर्यंत पिल्ल्यांचे
पंख कोरडे होत नाही. मादी
बदक हलकासा आवाज
करते. अचानक ती थांबते.



घरट्याच्या समोर

आरडाओरडा होतो.





एक खारूताई आपले तोंड घरट्याच्या मध्ये डोकावते. झाडातली ही ढोल कधीतरी तिचे घर होते. पण आता ते बदकाचे घरटे आहे. बदक तिला आत येऊ देत नाही.

दुसऱ्या दिवशी बदके कोरडी होतात. त्यांचे पंख मुलायम आणि केसाळ होतात.



क्वाक !क्वाक !क्वाक

बदके एकमेकांना हाक मारतात आणि वरखाली उड्या मारतात. ते आता घरटे सोडायला तयार आहेत. ते आता पोहायला आणि आपले अन्न शोधायला तयार आहेत.





मादी बदक घरट्यातून बाहेर येते. तिला एकही प्राणी आसपास दिसत नाही. आता पिल्लांनी बाहेर येणे सुरक्षित आहे. मादी बदक तलावात उडी मारते. कुक, कुक, कुक, कुक, कुक.

ती आपल्या पिल्लांना बोलावते.



झाडाच्या ढोलीत पिल्ले तिचा आवाज ऐकतात. ते वरखाली उड्या मारतात. एक पिल्लू घरट्यातून बाहेर येते.

ते चढण्यासाठी आपल्या पंजाचा उपयोग करते.







पिल्लू बाहेर बघते.

मग ते आपले पंख पसरवते
आणि पाण्यात उडी घेते.




पिल्लू पोहत आईजवळ येते.

मग अजून एक पिल्लू खाली येते
आणि मग अजून एक, अजून एक
आणि अजून.

प्रत्येक पिल्लू पोहत आईजवळ येते.

आणि तिच्या आसपास पोहत राहते.



आता सहा पिल्ले आईबरोबर आहेत. ते आईबरोबरीने पोहण्यास तयार आहेत. पण ती थांबते, घरट्यातून अजूनही आवाज येत आहे.



दोन पिल्ले अजूनही आत आहेत.

ते बाकीच्यासारखे ताकदवान नाहीत. ते घरट्यात वर येण्याचा प्रयत्न करतात पण परत खाली पडतात.





शेवटी एक पिल्लू वर येते.

दुसरे पिल्लू पण वर येते आणि ते पाण्यात उडी मारतात आणि आईजवळ पोहत येतात.

मादी बदक घरट्यातून आवाज येतो का हे बघते. पण काहीच आवाज ऐकू येत नाही. मग ती आठ पिल्यांना घेऊन पोहू लागते.





आता मादी बदक आणी तिची
पिल्ले तलावातच राहतील.



बदकाची पिल्ले बाहेर येण्याच्या
आधीच नर बदक उडून गेले. आता
मादी बदकालाच पिल्लांची काळजी
घ्यावी लागणार होती.

काही प्राण्यांना बदकाची पिल्ले खायला आवडतात. मादी बदक त्या प्राण्यांवर नजर ठेवते. तिला विचित्र आवाज ऐकू येतात.

परिवार काही जलवनस्पतीजवळ पोहत असतो. एक कासव तिथे लपले आहे. मादी बदकाला याची कल्पना नाही.



कासव जवळ येते,मादी बदकाला त्याचा आवाज येतो. ती सावध करणारा आवाज काढते. ती वेगाने पोहते. बदकाची पिल्ले सुद्धा वेगाने पोहू लागतात. पण एक पिल्लू वेगाने पोहू शकत नाही. तेवढ्यात कासव आपले तोंड उघडते आणि एका पिल्लाला खाऊन टाकते.





दुसऱ्या दिवशी सकाळी एक मोठा मासा बदकाच्या पिल्लांची टोळी बघतो. तो पोहत येतो आणि बदकाचे एक पिल्लू आपल्या तोंडात पकडतो.




आता फक्त सहा पिल्ले राहिली आहेत.

ते जवळपास दोन महिने आईच्या जवळ राहतील. ते आईचा आवाज ऐकतील आणि आई जिथे जाईल तिथे ते जातील.







ते नाकतोड्याचा,
डासांचा पाठलाग
करतात.

सुरुवातीला तर बदकाचे पिल्ले त्यांना पकडू शकत नसत. पण परत परत प्रयत्न केल्यावर ते त्यांना पकडू लागले. बदकाची पिल्ले बिया पण खातात.



बदकाची पिल्ले त्या प्राण्यांपासून लपण्याचा प्रयत्न करतात. जे त्यांना खाऊ शकतात. तलावात ते खोलवर बुडी मारतात.





ते जमिनीवर बसतात आणि अजिबात हलत नाही.



दिवस जात असतात आणि बदकाची पिल्ले मोठी होत जातात. त्यांची बालपणातले पंख झडून जातात. आता त्यांना मादी बदकाच्या सोबतीची गरज राहत नाही.

ते आता स्वतः उडू शकतात.



लवकरच ते इतर बदकांना जाऊन मिळतात आणि हिवाळ्यासाठी उडून जातात. मादी बदक सुद्धा असेच करते.

पुढच्या वसंतात जेव्हा एक छोटी मादी बदक तलावाकडे उडत येते तेव्हा तिच्या बरोबर नर बदक सुद्धा असते. तो तिचा जोडीदार आहे. मादी बदक घरटे शोधते. झाडावरची एक ढोल सुतार पक्षाची आहे.दुसरी खारुताईची आहे आणी तिसरी रिकामी आहे. पण मादी बदक त्यात जात नाही.






तरुण मादी बदक एका वेगळा ढोलीत जाते. तिथे आत अंधार आणि शांतता आहे. तिथे पंख आणि पानाचे तुकडे आहेत. हे एक जुने घरटे आहे. जे मादी बदकाने बनवले आहे.

तरुण मादी बदक अंडी देण्यासाठी जागा निवडते.

ही एक खास जागा आहे, पण मादी बदकाला त्याची माहिती नाही.





हे तेच घरटे आहे जिथे मागच्या उन्हाळ्यात ती अंडं फोडून बाहेर आली होती.